मसुदा मंजुरीसाठी सादर

उप रचनाकार

सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ

वरिष्ठ नगर रचनाकार

मुख्य नियोजक

मा.मु.का.अ.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

क्र. मऔविम/आय. आय.ए. (लॉजिस्टिक पार्क)/ P- २८५७९५ /२०२६

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१

ज्याअर्थी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील अनुक्रमे कलम १४ (एक) आणि कलम १४ (दोन) (ब) नुसार, सामान्यतः, महाराष्ट्र राज्यात उद्योगधंद्यांची त्वरीत व पध्दतशीर स्थापना करण्यास व त्यांची वाढ करण्यास तसेच त्यांचा विकास करण्यास प्रोत्साहन देणे व त्यासंबंधात मदत करणे. आणि राज्य शासनाने या प्रयोजनासाठी निवडलेल्या औद्योगिक क्षेत्रांचा विकास करणे आणि उपक्रमांची स्थापना होण्यासाठी अशी क्षेत्रे त्यांना उपलब्ध करून देणेसंदर्भात महामंडळाची कामे स्पष्ट करण्यात आलेली आहेत;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील कलम १५ (के) नुसार महामंडळाचे सर्वसाधारण अधिकारांतर्गत आपले कामकाज योग्यरीतीने पार पाडण्यास आणि या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यास त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा इतर गोष्टी व कामे करणे,

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे तरतूदी अंतर्गत राज्य शासनाने औद्योगिक क्षेत्र म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सद्याचे नांदेड औद्योगिक क्षेत्र उक्त अधिनियमाचे हेतुस्त्व यापूर्वी अधिसूचित केलेले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम ४३-(१ब) नुसार महामंडळास कोणत्याही औद्योगिक क्षेत्राला राजपत्रातील अधिसुचनेव्दारे -एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून अधिसूचित करता येईल आणि अशी अधिसुचना काढल्यावर, महामंडळ हे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये अशा एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता विशेष नियोजन प्राधिकरण होईल;

ज्याअर्थी, उद्योग, उर्जा व कामगार विभागाची अधिसूचना १४ फेब्रुवारी २०१८ आणि दिनांक २६ ऑगस्ट २०२४ अन्वये महाराष्ट्राचे लॉजिस्टीक धोरण जाहीर करणेत आले आहे. आणि महामंडळाचे

CDCPR-२०२३ मधील विनियम क्र.१.९ मधील तरतुदी नूसार सदर धोरण महामंडळास लागू करणेबाबत नमूद केले आहे. तसेच उपरोक्त नियमावलीतील विनियम क्र.१२.३ मधील तरतुदीनुसार एकात्मिक लॉजिस्टिक पार्क स्थापन करण्याचे कार्यपद्धती अवलंबण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, महामंडळाच्या नांदेड औद्योगिक क्षेत्रातील मे. टेक्सटाईल कॉर्पोरेशन ऑफ मराठवाडा लि. यांचेकडील भुखंड क्र. बी-७ ते बी-१२. वरील ८.१८ हे. क्षेत्राला एकात्मिक लॉजिस्टीक पार्क स्थापन करण्यास दि०९/०४/२०२५ रोजी संपन्न झालेल्या १७३ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मान्यता मिळाली आहे. परंतु, नांदेड औद्योगिक क्षेत्रामधील लॉजिस्टिक वापराचे प्रमाण विचारात घेऊन ६.८७ हे. क्षेत्रावर एकात्मिक लॉजिस्टिक पार्क स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे.

आणि ज्याअर्थीव्या उच्चाधिकार समितीच्या १२७ रोजी संपन्न झालेल्या ०१.१०.२०२० दि बैठकीच्याइतिवृत्ता नुसार एकात्मिक औद्योगिक क्षेत्र घोषित करण्यासाठीच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील कलम ४३ (१ब) अन्वये एकात्मिक लॉजिस्टीक पार्कच्या प्रकरणांची कारवाई करण्यात यावी असे निर्देश महामंडळास देण्यात आले आहे;

त्या अर्थी, शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१, (सनचा २०१३-सुधारणा अधिनियम, १५खंड ४३ च्या कलम (१ब)) अन्वये महामंडळास प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन निम्नस्वाक्षरीकार, म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ याव्दारे खालील अनुसुचित उल्लेखिलेल्या क्षेत्रास - एकात्मिक औद्योगिक क्षेत्र (लॉजिस्टीक पार्क) म्हणून घोषित करीत आहे.

परिशिष्ट

(क्षेत्राचे वर्णन)

| अ. क्र. | औद्योगीक क्षेत्राचे नाव | भूखंड क्र. | एकूण क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| १ | नांदेड औद्योगिक क्षेत्र | बी -७ ते बी-१२ | ६.८७ |
| | | एकूण | ६.८७ |

<u>चतु : सीमा</u>

उत्तरेस : महामंडळाच्या नांदेड औद्योगिक क्षेत्राची हद्द.

दक्षिणेस : ३०.५० मी. रुंदीची रस्ता.

पूर्वेस : भूखंड क्र. बी ६ए ते बी ६ड आणि भूखंड क्र. बी २/१४.

पश्चिमेस: ~~सेड स्ट्रीप आणि~~ भूखंड क्र.बी-१३ ते १२ चे उर्वरित क्षेत्र.

ठिकाण .

दिनांक : २४/०३/२०२६

पी. वेलरासु, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ